सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## (सामान्य प्रशासन विभाग)

# मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी

मदता

प्रशिक्षणातून परिवर्तन

निविदा क्र. ०४ /२०२५

**प्रशिक्षण अभ्यास दौऱ्याकरिता वाहन भाडेतत्वावर करार पध्दतीने घेणे बाबत.**


| | |
|---|---|
| संस्थेचा संपर्क तपशील | www.madta.org.in<br>prabhodini31paithan@gmail.com<br>02431 350605<br>+91 9421329819 / +91 9420798700 |
| पत्ता - नाथनगर (उत्तर) पेठण, ता. पेठण जि. छत्रपती संभाजीनगर - ४३११४८ | |


सहाय्यक लेखाधिकारी

निबंधक 11/09/25

संचालक 11/09/2025

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
(सामान्य प्रशासन विभाग)
**मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी**
**नाथनगर (उत्तर), पैठण जि. छत्रपती संभाजीनगर**
(विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर विभाग)

मदता
प्रशिक्षणातून परिवर्तन

www.madta.org.in | prabhodini31paithan@gmail.com | ☎ 02431350605

**निविदा क्र. ०४/२०२५** **दिनांक १२/०९/२०२५**

**विषय :- प्रशिक्षण अभ्यास दौऱ्याकरिता वाहन भाडेतत्वावर करार पध्दतीने घेण्याकरिता दरपत्रक मागविणे बाबत.**

## दरपत्रक सूचना

मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण जि. छत्रपती संभाजीनगर ही संस्था सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिनस्त स्वायत्त प्रशिक्षण संस्था असून छत्रपती संभाजीनगर विभागाची विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था आहे. या संस्थेत शासन सेवेतील गट ब आणि गट क संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी यांना निवासी प्रशासकीय प्रशिक्षण दिले जाते. त्यानुषंगाने संस्थेच्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये प्रशिक्षणार्थीकरिता अभ्यास दौरा आयोजित करण्यात येतो. सदर अभ्यास दौऱ्याकरिता संस्थेच्या आवश्यकतेप्रमाणे वाहन पुरविण्याकरिता इच्छुक सेवापुरवठाधारकाकडून खालील अटी व शर्तीस अधीन राहून स्पर्धात्मक पध्दतीने दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| कामाचे नाव | निविदा कालावधी |
|---|---|
| प्रशिक्षण अभ्यास दौऱ्याकरिता वाहन भाडेतत्वावर करार पध्दतीने घेणे बाबत. | आदेशापासून 365 दिवस |

२) **वेळापत्रक :-**

| अ.क्र | बाब | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | दरपत्रक दाखल करणे | १२/०९/२०२५ ते २६/०९/२०२५ | कार्यालयीन वेळेमध्ये (शासकीय सुट्टी वगळून) |
| २ | दरपत्रक लिफाफा उघडणे | २९/०९/२०२५ | दुपारी १२.०० वाजता<br>(सहभागी सेवापुरवठादार उपस्थित असो किंवा नसो) |

३) **दरपत्रक सादर करण्याची पध्दत :-**

१. दरपत्रक मोहोरबंद असणे आवश्यक राहील.

२. दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यात विहीत मुदतीत संस्थेस सादर करावे.

३. विहीत मूदतीनंतर प्राप्त दरपत्रक लिफाफायांचा विचार केला जाणार नाही.

४. मोहोरबंद लिफाफयांमध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रे व BOQ मध्ये दर सादर करणे बंधनकारक राहील.

   १. आधारकार्ड / पॅनकार्ड / पासपोर्ट / मतदार ओळखपत्र इ. पैकी कोणतेही एक ओळखपत्र.
   २. वाहनचालकाचा वाहन चालविण्याचा परवाना ( Driving License )

सहाय्यक लेखाधिकारी | निबंधक 12/09/25 | संचालक 12/09/25

Scanned with OKEN Scanner

३. वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र (RC), फिटनेस प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र इ.

४. महाराष्ट्र परिवहन विभागाचे इतर आवश्यक कागदपत्रे

| अ.क्र | तपशील (A) | अंतर मर्यादा | आसन क्षमता | सेवापुरवठाचे दर (जीएसटी वगळून) (B) |
|---|---|---|---|---|
| १. | मिनी बस | ०८ तास व कमाल ५० किलोमीटर प्रतिदिन | १७ | |
| २. | बस | ०८ तास व कमाल ५० किलोमीटर प्रतिदिन | ५० | |

४) <u>दरपत्रकेच्या अटी व शर्ती</u> :-

१. स्तंभ (B) मध्ये नमूद करण्यात येणारे दर हे GST वगळून सादर करण्यात यावे.
२. स्तंभ (B) मध्ये नमुद केलेले दराव्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम सेवापुरवठाधारकांस देय असणार नाही.
३. उपरोक्त दर नमूद करतांना निविदेतील सर्व अटी व शर्ती अवलोकन/वाचूनच दर नमूद करावे.
४. कोणतेही दरपत्रक/निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर नाकारण्याचा व रद्द करण्याचा अधिकार या संस्थेने राखून ठेवला आहे.
५. वाहनावर नि:शुल्क अनुभवी परवानाधारक वाहनचालक पुरवठाधारकाने पुरविणे आवश्यक राहील.
६. बाहेरगावी अभ्यास दौरा ठरल्यास रस्ता टोल पुरवठाधारकांकडे राहील.
७. अभ्यासदौऱ्यादरम्यान वाहनास तांत्रिक बिघाड झाल्यास व वाहन जागेवर बंद पडल्यास तात्काळ दुसरे वाहन उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.
८. संस्थेच्या आवश्यकतेप्रमाणे व सूचनेनुसार वाहन उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.
९. संस्थेने अभ्यासदौऱ्याकरिता ठरवून दिलेले दिनांक व वेळेचे पालन करणे आवश्यक राहील.
१०. वाहनाची प्रति दिन ०८ तास व कमाल ५० किलोमीटर अंतर मर्यादा राहील.
११. वाहन स्वच्छ असणे आवश्यक आहे
१२. निविदा प्रक्रिया राबवितांना सहभागी निविदाधारकाचे एकसमान दर आल्यास सदर प्रकरणी वाटाघाटी करुन निविदा अंतिम करण्याचा अधिकार संस्थेने राखून ठेवला आहे.
१३. दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या बस उच्च दर्जाचे पुरविणे आवश्यक राहील.
१४. प्रशिक्षण संस्थेच्या सुनिश्चितीनंतर सेवेचे देयक RTGS पध्दतीने अदा करण्यात येईल.
१५. वाहनाचा यथायोग्य विमा उतरविलेला असणे आवश्यक राहील.
१६. परिवहन विभागाच्या अनुषंगाने आवश्यक त्या पात्रता/ अटी व नियमांची पूर्तता करणे आवश्यक राहील.

५) <u>निवड प्रक्रिया</u> :-

१. <u>**निविदा न्युनतम दर ठरविण्यासाठी BOQ मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे स्तंभ (B) मध्ये नमूद केलेल्या ०१ ते ०२ दरांची बेरीज करुन एकुण आलेल्या दरांचे तुलनात्मक अवलोकन करुन न्युनतम दर (L१) निश्चिती करण्यात येईल.**</u>

२. दरपत्रकधारकांना काही तक्रार असल्यास मा. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे तक्रार करता येईल. मात्र या प्रकरणी मा. विभागीय आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल.

६) **प्रसिध्दीस्तव -**

१. संस्थेचे सूचनाफलक (Notice Board)

२. संस्थेचे संकेतस्थळ www.madta.org.in

सहाय्यक लेखाधिकारी | निबंधक 11/03/25 | संचालक 11/03/25

Scanned with OKEN Scanner